बुधवार, दि १४ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

जालना मनपा निवडणूक २०२६; प्रभाग क्र. ६ मध्ये भाजपची भव्य रॅली; माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांची उपस्थिती

## भाजपचा महापौर होणार; आ. लोणीकरांचा विश्वास






**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक ६ मधील भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि नेतृत्वात एक भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीने संपूर्ण परिसर 'भगवामय' झाला असून, भाजपच्या विजयाचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला

**विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक:**
यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना बबनराव लोणीकर म्हणाले की, गेल्या १५ दिवसांपासून माजी आमदार कैलासजी गोरंट्याल आणि रावसाहेब दानवे यांच्यासह सर्व पदाधिकारी विकासाच्या मुद्द्यावर जनतेकडे मते मागत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारचा निधी आणून जालना शहराचा कायापालट करणे, रस्ते, पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सुविधा पुरवणे हे भाजपचे मुख्य ध्येय आहे . मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही शहराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही दिली असल्याचे त्यांनी नमूद केले

**प्रभाग क्रमांक ६ चे अधिकृत उमेदवार:**
प्रभाग क्रमांक ६ मधून भाजपने खालील लोकप्रिय उमेदवारांना रिंगणात उतरवले आहे:
सौ. संगीता कैलास गोरंट्याल (माजी नगराध्यक्षा), प्रियंका रोहित भुरेवाल, वीरेंद्र अमरचंद धोका, संतोष गंगाराम माधोवाले लोणीकर यांनी विश्वास व्यक्त केला की, हे चारही उमेदवार जनतेच्या कामातले असून या प्रभागातील जनता त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देईल

**भाजपचा महापौर होण्याचा विश्वास:**
कैलासजी गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाची ताकद वाढली असून, ४० पेक्षा जास्त नगरसेवक निवडून येतील आणि जालन्यात भारतीय जनता पार्टीचाच महापौर व उपमहापौर विराजमान होईल, असा दावा लोणीकर यांनी केला . जालना शहराला मराठवाड्यातील 'टॉप १०' शहरांमध्ये समाविष्ट करून संभाजीनगरच्या बरोबरीने नेण्याचा आमचा संकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले या रॅलीतील अलोट गर्दी पाहून लोणीकर यांनी समाधान व्यक्त केले आणि ४० वर्षांच्या राजकीय कारकीर्दीतील ही एक ऐतिहासिक रॅली असल्याचे वर्णन केले.

## सामान्यांचा आवाज दाबणाऱ्यांना रोखा

प्रभाग ९ आणि १० च्या सभेत आ. अर्जुनराव खोतकर यांचे आवाहन





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात विशेषतः प्रभाग ८, ९ आणि १० मध्ये सध्या दहशतीचे वातावरण आहे. जनतेच्या मनात असलेल्या या भीतीला आणि नाराजीला उत्तर देण्याची हीच योग्य वेळ आहे. सामान्यांचा आवाज दाबणाऱ्यांना रोखण्यासाठी शिवसेनेचे उमेदवार सक्षम आहेत, असे प्रतिपादन माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनी केले.

मंगळवारी प्रभाग ९ आणि १० मधील शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ गांधी चमन येथे एका भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेपूर्वी प्रभागातून काढण्यात आलेल्या रॅलीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. व्यासपीठावर प्रभाग ९ मधील उमेदवार रंजिता पाचफुले, शुभम टेकाळे, राखी ठाकूर तसेच प्रभाग १० मधील उमेदवारांसह शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर, अनिरुद्ध खोतकर, युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. बोराडे, अश्विन आंबेकर यांची उपस्थिती होती.

सभेला संबोधित करताना आ. खोतकर यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली. ते म्हणाले की, विष्णू पाचफुले यांच्यासारखे आश्वासक नेतृत्व शिवसेनेने दिले आहे. जनतेला सुरक्षित वाटावे आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, हाच आमचा उद्देश आहे. जर कुणी दहशतीचे राजकारण करत असेल, तर त्याला जशास तसे उत्तर देण्याची आमची पूर्ण तयारी आहे. आता बदल अटळ असून शिवसेनेचे सर्व उमेदवार बहुमताने विजयी होतील.
विकासाचे व्हिजन आणि जनतेची साथ उमेदवार विष्णू पाचफुले यांनी आपल्या भाषणात प्रभागाच्या दुरवस्थेवर बोट ठेवले. आम्ही नवीन असलो तरी विकासाचा ठोस आराखडा आमच्याकडे आहे. ज्यांनी इतकी वर्षे केवळ सत्ता भोगली, त्यांचे गर्वहरण करण्याची संधी आता मतदारांच्या हातात आहे. 'दगडापेक्षा वीट मऊ' या भावनेतून जनतेने आमच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**मातंग मुक्ती सेनेचा जाहीर पाठिंबा :** या सभेचे विशेष आकर्षण म्हणजे मातंग मुक्ती सेनेचे अशोक साबळे यांनी शहरातील शिवसेनेच्या सर्व ६५ उमेदवारांना आपला जाहीर पाठिंबा घोषित केला. शहर विकासासाठी आणि सर्वसमावेशक राजकारणासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

या सभेला दोन्ही प्रभागातील जनतेसह शिवसेनेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यात निवडणुकांचे बिगुल!

## १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान

**मुंबई -** राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मुहूर्त अखेर जाहीर झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम आज घोषित केला. यानुसार, येत्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी पार पडेल. या घोषणेमुळे राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये आजपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे.

**या १२ जिल्ह्यांत होणार निवडणुका:** ज्या जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या आत आहे, अशा पहिल्या टप्प्यातील १२ जिल्ह्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत: पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर,
अधिसूचना प्रसिद्धी: (आयोगाच्या निर्देशानुसार लवकरच), मतदान दिनांक: ५ फेब्रुवारी २०२६ (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३०), मतमोजणी व निकाल: ७ फेब्रुवारी २०२६

**आरक्षणाचा पेच आणि न्यायालयाचा निर्णय:** सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, प्रशासकीय तयारी आणि मतदान यंत्रांच्या उपलब्धतेसाठी आयोगाने मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने १५ फेब्रुवारीपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याची सवलत दिल्यानंतर आयोगाने हा कार्यक्रम जाहीर केला आहे. उर्वरित २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक असल्याने, त्याबाबतचा निर्णय न्यायालयाच्या पुढील सुनावणीनंतर घेतला जाणार आहे.

**राजकीय वातावरण तापले:**
या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांकडे 'मिनी विधानसभा' म्हणून पाहिले जात आहे. ग्रामीण भागातील सत्तेची ही केंद्रे ताब्यात घेण्यासाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी आता कंबर कसली आहे. आचारसंहिता लागू झाल्यामुळे विकासकामांच्या घोषणांवर निर्बंध आले असून, आता राजकीय नेत्यांच्या दौऱ्यांनी आणि सभांनी ग्रामीण भाग गजबजून जाणार आहे.

## संपादकीय

# पृथ्वीचा गोल; भुगोल

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहित आहे. भूगोल हा विषय आपण लहान वयापासूनच शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलातील ज्ञान अफलातून होते म्हणूनच त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील Geography या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरून आलेल्या या शब्दाचा अर्थ भुवर्णन शास्त्र. पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते.

भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे.

१ ) प्राकृतिक भूगोल
२ ) मानवी भूगोल
३ ) प्रादेशिक भूगोल

प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबत किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश होतो. मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो. प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात विविध पद्धतीचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र, निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, द्रोण कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग, त्याचे स्वरूप विविध प्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

**श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**

# शास्त्रशुद्ध आणि पर्यावरणपूरक संक्रांत

मनुष्य हा उत्सव प्रिय प्राणी आहे. विविध उत्सवांच्या म ाध्यमातून तो आपल्या मनातील भाव व्यक्त करत असतो.
हिंदू धर्मात विविध उत्सवांच्या माध्यमातून केवळ धार्मिकताच दर्शविली जात नाही, तर प्रत्येक उत्सव, सण आणि व्रत हे मनुष्याला निसर्गाच्या अधिक जवळ नेणारे आहेत. त्यातीलच एक म्हणजे मकर संक्रांत. हा प्राकृतिक उत्सव आहे, म्हणजे प्रकृतीशी ताळमेळ साधणारा उत्सव. दक्षिण भारतात हे पर्व 'थई पोंगल' नावाने ओळखले जाते. सिंधी लोक या पर्वाला 'तिरमौरी' म्हणतात. महाराष्ट्रात तसेच हिंदी भाषिक 'मकर संक्रांत' म्हणतात आणि गुजरातमध्ये हे पर्व 'उत्तरायण' नावाने ओळखले जाते.
मकर संक्रांतीचा काळ :
मकर संक्रात या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. भारतीय संस्कृतीत हा सण आपापसातील कलह विसरून प्रेमभाव वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी प्रत्येक जण 'तीळगूळ घ्या, गोड बोला' असे म्हणून हेवेदावे विसरून मनाने जवळ येतात. इतर सणांप्रमाणे हा सण तिथीवाचक नाही. सध्या मकर संक्रांतीचा दिवस १४ जानेवारी हा आहे. सूर्यभ्रमणामुळे पडणारे अंतर भरून काढण्यासाठी क्वचित प्रसंगी संक्रांत एक दिवसाने पुढे ढकलली जाते म्हणजे १५ जानेवारीला असते. २०२६ मध्ये मकर संक्रांत १४ जानेवारीला आहे. हिंदु धर्मात संक्रांतीला देवता मानले आहे. संक्रांतीने संकरासुर दैत्याचा वध केला, अशी कथा आहे. संक्रांतीच्या दुसर्या दिवसाला किंक्रांत अथवा करिदिन असे म्हटले जाते. या दिवशी देवीने किंकरासुराला ठार मारले.
मकर संक्रांतीचे महत्त्व :
या दिवशी सूर्याचे उत्तरायण चालू होते. या दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वातावरण अधिक चैतन्यमय



असल्याने साधना करणाऱ्याला या चैतन्याचा लाभ होतो. कर्क संक्रांती पासून मकर संक्रांती पर्यंतच्या काळाला 'दक्षिणायन' म्हणतात. दक्षिणायनापेक्षा उत्तरायणात मरण येणे अधिक चांगले समजले जाते.
मकर संक्रांतीच्या पर्वकाळात दान देण्याचे महत्व ! : मकर संक्रांत ते रथसप्तमी पर्यंतचा काळ हा पर्वकाळ असतो. या वेळी केलेली पुण्य कर्मे विशेष फलद्रूप होतात. धर्मशास्त्रानुसार या काळात दान, जप, धार्मिक अनुष्ठान यांचे अत्यंत महत्त्व आहे. या काळात दिलेले दान पुनर्जन्म झाल्यानंतर शंभरपटीने प्राप्त होते अशी मान्यता आहे.
**हळदी-कुंकू करण्याचे महत्त्व :**
मकर संक्रांत ते रथ सप्तमी हळदीकुंकू समारंभ केले जातात. मकर संक्रांतीला ब्रह्मांडाची चंद्रनाडी कार्यरत असते. सूर्याच्या उत्तरायणामध्ये ब्रह्मांडात रज-सत्त्व लहरी अधिक असतात. अशा पोषक काळामध्ये हळदीकुंकू करणे हे लाभदायक असते. या माध्यमातून सुवासिनींच्या रूपात घरी आलेल्या साक्षात् आदिशक्तीचीच पूजा करत असतो.
**वाण देणे :**
'नवे भांडे, वस्त्र, अन्न, तीळ, तीळपात्र, गूळ, गाय, घोडा, सोने किंवा भूमी यांचे यथाशक्ती दान द्यावे असे शास्त्रात सांगितले आहे. मकर संक्रांती निमित्त सुवासिनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम करून जे दान देतात, त्याला 'वाण देणे' असे म्हणतात. काही पदार्थ सुवासिनी कुमारिकांकडून लुटतात आणि तीळगूळ देतात.' आजकाल अधार्मिक वस्तूंचे वाण देण्याची चुकीची प्रथा पडली आहे. वाणात देण्यात येणाऱ्या वस्तु सात्विक असाव्या. सात्त्विक वाण देणे, हा धर्मप्रसारच असून त्यामुळे ईश्वरीकृपा होते. या वस्तूंमध्ये सौभाग्याच्या वस्तू, उदबत्ती, उटणे, धार्मिक ग्रंथ, पोथ्या, देवतांची चित्रे इत्यादी अध्यात्माला पूरक अशा वस्तूंचे वाण द्यावे.
सुगड वाण देणे :
मकर संक्रांतीच्या सणाला 'सुगड्याचे' वाण देतात. सुगड म्हणजे मातीचे छोटा घट. सुगड्यांना हळदी-कुंकवाची बोटे लावून दोरा गुंडाळतात. त्यात गाजर, बोरे, उसाची पेरे (कांड्या), वाटाणा आणि वालाच्या शेंगा, कापूस, हरभरे, तीळगूळ, हळदी-कुंकू इत्यादी घालून पाट मांडून त्याच्या भोवती रांगोळी काढतात, त्या पाटावर ही पाच सुगडे ठेवतात. त्यांचे पूजन करतात. त्यातील तीन सुगडी सवाष्णींना दान (वाण) देतात, एक सुगड तुळशीला आणि एक स्वतः करिता ठेवतात.
मकर संक्रांतीच्या काळात तीर्थस्नान करण्याचे महत्व : या काळात तीर्थस्नान केल्याने महापुण्य मिळणे. मकरसंक्रांतीला सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पुण्यकाळ असतो. या काळात गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा आणि कावेरी या नद्यांच्या काठी असलेल्या क्षेत्रावर स्नान करणार्यास महापुण्य लाभते.
तीळगुळ वाटणे : तीळगुळाचे सेवन केल्याने अंतर्शुद्धी होऊन साधना चांगली होते. इतरांना तीळगूळ देण्यापूर्वी देवासमोर ठेवल्याने तो प्रसाद होतो, त्यातील शक्ती व चैतन्य टिकून रहाते. समोरच्याला तिळगुळ दिल्यावर त्याच्यातील प्रेमभाव आणि सकारात्मकता वाढते.
बाळाचे बोरन्हाण : मूल जन्माला आल्यानंतर प्रथम येणार्या मकर संक्रांतीच्या दिवशी आप्तेष्टांच्या लहान मुलांना बोलावून हा समारंभ करतात. त्यासाठी बाळाला झबले शिवतात. त्यावर खडी काढतात किंवा हलव्याचे दाणे बसवतात. बाळाच्या अंगावर हलव्याचे दागिने घालतात. प्रथम औक्षण करून बाळाच्या मस्तकावर बोरे, उसाचे करवे, भुईमुगाच्या शेंगा व चुरमुरे हे सर्व पदार्थ एकत्र करून ओततात. यालाच बोरन्हाण म्हणतात. इतर मुले खाली पडलेले हे पदार्थ वेचून खातात. मग सुवासिनींना हळदी-कुंकू देतात. बोरन्हाण घातल्याने मुलाला पुढच्या उन्हाळ्याची बाधा होत नाही व त्याचे आरोग्य चांगले रहाते, असे समजतात. हा संस्कार मुख्यतः महाराष्ट्रात प्रचलित आहे.
मकर संक्रातीच्या दिवशी काळी वस्त्रे परिधान करण्याची चुकीची प्रथा : हल्ली मकर संक्रांतीच्या दिवशी लहान बालके आणि सुवासिनी काळी वस्त्रे परिधान करतात; 'मकर सक्रांतीच्या दिवशी काळी वस्त्रे परिधान करावीत अथवा परिधान केली, तरी चालतील', या सूत्राला कोणत्याही धर्मग्रंथाचा आधार नसल्यामुळे या दिवशी काळी वस्त्रे परिधान करू नयेत.
**संदर्भ : सनातनचा ग्रंथ(सण, उत्सव आणि व्रते)**

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## जालना महानगरपालिका निवडणूक:

# पोलीस प्रशासनाकडून शहरात तगडा बंदोबस्त आणि रुट मार्च

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी होणारे मतदान आणि १६ जानेवारी २०२६ रोजी होणारी मतमोजणी शांततेत पार पडण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

**नाकाबंदी आणि ड्रोनद्वारे देखरेख**

निवडणुकीच्या अनुषंगाने १२ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०.०० वाजेपासून शहरात नाकाबंदी करण्यात आली आहे. मामा चौक, शिवाजी महाराज पुतळा, मस्तगड, गांधीचमन, अंबड चौफुली आणि मंठा चौफुली यांसारख्या शहरातील मुख्य आणि महत्त्वाच्या ठिकाणी 'फिक्स पॉईंट' लावून कडक तपासणी केली जात आहे. विशेष म्हणजे, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांच्या सहाय्याने चित्रीकरण करण्यात येत आहे. तसेच, खबरदारीचा उपाय म्हणून सर्व आस्थापना रात्री १०.०० वाजेपर्यंत बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, ही कारवाई १४ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

मतदारांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता शहरातून भव्य रुट मार्च काढण्यात आला. हा मार्च शिवाजी महाराज पुतळा येथून सुरू होऊन शिकलकरी मोहल्ला, गांधीनगर, लोधी मोहल्ला, गोलम जीद, काद्राबाद चौकी, मस्तगड, भाग्यनगर आणि नुतनवसाहत मार्गे अंबड चौफुलीपर्यंत काढण्यात आला.

या रुट मार्चमध्ये पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि सहाय्यक पोलीस अधीक्षकांसह खालील फौजफाटा सहभागी झाला होता:

पोलीस निरीक्षक: ०६, पोलीस उपनिरीक्षक: २८, अंमलदार: १५० होमगार्ड: २५०, SRPF, RCP आणि QRT च्या तुकड्या

मतदान दिवशीचा बंदोबस्त

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. यामध्ये बूथ बंदोबस्त, सेक्टर बंदोबस्त आणि १०० मीटर परिसरात विशेष लक्ष दिले जाणार आहे. मतदान दिवशी एकूण ३६ अधिकारी, ६५० अंमलदार, ५२७ होमगार्ड आणि एसआरपीएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडावी यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सतर्क असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी कळविले आहे.

# लोकशाहीच्या मजबुतीसाठी प्रत्येकाने कर्तव्य भावनेने मतदान करावे-जावेद बावला

**जालना । प्रतिनिधी -** लोकशाही ही केवळ जनतेच्या सहभागावर उभी असलेली शक्ती आहे. ही शक्ती बळकट करायची असेल, तर प्रत्येक नागरिकाने कर्तव्यभावनेने मतदान करणे अत्यावश्यक आहे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा प्रगतशील शेतकरी जावेद अब्दुल कादर बावला यांनी केले आहे.

जावेद बावला म्हणाले की, निवडणूक म्हणजे केवळ उमेदवारांची स्पर्धा नसून, ती आपल्या हक्कांची, आपल्या भविष्याची आणि आपल्या शहराच्या दिशेची निवड आहे. मतदान न करणे म्हणजे आपल्या निर्णयाचा अधिकार स्वेच्छेने सोडून देणे होय. शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि सामान्य नागरिक या सगळ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेणारे प्रतिनिधी निवडून देण्याची ताकद मतपेटीत आहे. ही ताकद वापरली नाही, तर लोकशाही केवळ नावापुरती उरेल, असे ते म्हणाले. विशेषतः तरुणांनी 'माझ्या एका मताने काय फरक पडणार' ही मानसिकता सोडून देऊन मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. लोकशाहीच्या मजबुतीसाठी, पारदर्शक आणि उत्तरदायी शासनासाठी प्रत्येकाने मतदान हे आपले सामाजिक कर्तव्य मानून बजावावे, असे आवाहन जावेद बावला यांनी केले आहे.

# स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य देण्याबाबत समित्यांची संयुक्त बैठक संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील औद्योगिक विकास, उद्योजकांच्या समस्या तसेच स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय सल्लागार समिती, जिल्हा उद्योग मित्र समिती, आजारी उद्योग पुनर्वसन समिती तसेच स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य देण्याबाबत समिती यांची संयुक्त बैठक जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश साराणीकर, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक मंगेश केदार, पोलीस उप अधीक्षक निकाळजे,एन.एच.एल.एम. एल.चे प्रकल्प व्यवस्थापक विकास मलीक, असिस्टंट मॅनेजर एम.आय.डी.सी. एस.एस. नागरदेवळकर,बी.के.वाघमारे, किरण ढगे, औद्योगिक उद्यम संस्थेचे अर्जुन गेही, कालिका स्टीलचे व्यवस्थापक गोविंद गोयल, एस. आर. जे. स्टीलचे व्यवस्थापक चैतन्य पित्ती, विवेक पाटील, अनील राठोड यांची उपस्थिती होती.

या बैठकीत जुन्या एमआयडीसी क्षेत्रास जोडणारा कन्हैयानगर ते मंठा चौफुली या रस्त्यास जोडणारा स्वतंत्र बायपास रस्ता विकसीत करणे, औद्योगिक वसाहत परिसरात वाहनतळ व सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध करून देणे, जालना औद्योगिक वसाहतीमधून तयार केल्या जाणारे विविध उत्पादने तसेच औद्योगिक वसाहतीतील लघु व मध्यम उद्योजकांसाठी प्रशिक्षण, कार्यशाळा व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने ऑडिटोरियम व मीटिंग हॉलची सोय असणे गरजेचे आहे. सध्या अशा सुविधा नसल्याने उद्योजकांना योग्य मार्गदर्शन मिळण्यात अडचणी येतात, औद्योगिक वसाहत परिसरातील विद्युत सुविधांचे नुतनीकरण करणे, जालना जिल्ह्यातील एमआयडीसी फेज-१, फेज-२, फेज-३ मध्ये औद्योगिक वाढ व नव्या गुंतवणुकीसाठी जागा उपलब्ध नसल्याने नवीन एमआयडीसी फेज-५ ची तातडीने उभारणी करणे आवश्यक आहे. जालना जिल्ह्यातील रोजगार प्रामुख्याने येथील उद्योगांवर अवलंबून आहे. एमआयडीसी फेज-५ मंजूर झाल्यानंतर अनेक नवीन उद्योगांना चालना मिळेल. या विस्तारामुळे नवीन गुंतवणूक आकर्षित होईलच, तसेच जालनातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊन शहराचा आर्थिक विकास होईल.जालना औद्योगिक वसाहतीतील कामगार आणि उद्योजकांसाठी सुलभ सुरक्षित सार्वजनिक वाहतूक सेवा असणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या अनेक नागरिकांना त्याच्या कार्यस्थळी पोहोचण्यासाठी खाजगी वाहनावर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे वाहतूक कोंडी, खर्चवाढ आणि पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. करीता जालना औद्योगिक वसाहतीसाठी सीटी बस सेवा सुरू करणे यासह अन्य विषयावर चर्चा झाली. यावेळी उद्योजकांनी औद्योगिक वसाहत परिसरातील विद्युत दुरुस्तीविषयक कामे एकाच दिवशी करावी, टोलनाका शेलगाव येथे हलविणे, समृद्धी महामार्ग प्रवेशाच्या ठिकाणी फ्लाय ओव्हर तयार करणे, सीसीटीव्हीसाठी विद्युत कनेक्शन देणे,दवाखान्यासाठी जागा उपलब्ध करून देणे या समस्या सोडविण्याची मागणी केली. उद्योग सुरु असताना उद्योजकांना येणाऱ्या अडचणींचे वेळेत निराकरण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना दिले.

स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील उद्योगांनी स्थानिक मनुष्यबळाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. उद्योग व प्रशासन यांच्यात समन्वय ठेवून रोजगारनिर्मिती वाढविण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले.

# विशेष पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांनी केली मतमोजणी केंद्राची पाहणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेकरीता दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून दि. १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. या अनुषंगाने छत्रपती संभाजी नगर विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी व आयुक्त जालना शहर महानगरपालिका आशिमा मित्तल,पोलीस अधिकक्षक अजय कुमार बंसल यांनी जालना औद्योगिक वसाहतीमधील सिद्धीकी इंजिनिअरिंग याठिकाणी उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची संयुक्त पाहणी केली.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, प्रशिक्षणार्थी आय. पी. एस. जान्हवी शेखर, पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका अर्जुन गिराम, तहसीलदार सुमन मोरे यांची उपस्थिती होती.

यावेळी त्यांनी सुरक्षा कक्ष, मतमोजणी केंद्रातील सुरक्षा व्यवस्था, प्रवेश व निर्गमन मार्ग, सीसीटीव्ही व्यवस्था, अग्निशमन सुविधा, वीजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची सोय तसेच कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला. मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या. मतमोजणी प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी आणि नागरिकांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही सूचना करण्यात आल्या.

# जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेसाठी दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी जालना शहरातील २९१ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जालना शहर महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी आज दि. १३ जानेवारी २०२६ रोजी शहरातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील मूलभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी त्यांनी शहरातील व्ही. एस. एस. कॉलेज, दिनदयाळ उपाध्याय हॉल (विद्युत कॉलनी), ऑक्सफर्ड इंग्रजी शाळा, जालना शहर महानगरपालिका प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा (विसावा) नुतन वसाहत, जालना, सीटीएमके गुजराती विद्यालय अशा एकूण ०५ ठिकाणी असलेल्या २१ मतदान केंद्रांची पाहणी केली.पाहणीदरम्यान मतदान केंद्रांवरील पुरेशी प्रकाश व्यवस्था, दार-खिडकींची स्थिती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दिव्यांग मतदारांसाठी रॅम्पची उपलब्धता याबाबत सखोल तपासणी करण्यात आली. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व मतदान केंद्रांवरील मूलभूत सुख-सुविधा वेळेत व योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी व आयुक्त जालना शहर महानगरपालिका आशिमा मित्तल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या पाहणीवेळी शहर अभियंता सय्यद सऊद, पाणीपुरवठा अभियंता अनिल भद्रे, विद्युत अभियंता श्रीमती कोमल गावंडे तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व सुरक्षित पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## प्रभाग क्र. १ मध्ये रॅली, सभाने वातावरण भाजपामय

# मराठवाड्यातील आदर्श महानगर पालिकेसाठी भाजपाला मत द्या - रावसाहेब दानवे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, आज प्रभाग क्रमांक १ मध्ये काढण्यात आलेल्या भव्य रॅलीने संपूर्ण परिसरात भाजपच्या विजयाचा विश्वास निर्माण केला. या रॅलीमुळे जालना शहरात भाजपचाच महापौर होणार, हे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

ही भव्य रॅली चित्रकुट निवासस्थान येथून सुरू होऊन वरकड हॉस्पिटल, काटकर अप्पा यांचे घर, मुळे सर, शुक्ला सर, कान्हेरे सर, एखंडे पाटील यांचे घर, फाईन लिविंग, लामगे सर, देविदान रेसिडेन्सी, वाघचौरे किराणा, राधाकृष्ण मंदिर, दिपवाल सर, सुरा सर, म्हाडा ऑफिस, सेठी यांचे घर, अजित मानधने यांचे घर, पार्श्वभूमी कार्यालय, भाजपा कार्यालय व स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे चौक येथे जाहीर सभेसाठी समाप्त झाली. रॅलीदरम्यान नागरिक, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. भाजप जिंदाबाद ‘ कमळ निशाणीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

सभेला उपस्थित माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी भाजपच्या कार्यकाळातील विकासकामांचा उल्लेख करत सांगितले, जालना शहराचा सर्वांगीण विकास, मजबूत पायाभूत सुविधा, नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सक्षम प्रशासन ही भाजपची ओळख आहे. येणाऱ्या काळात जालना हे मराठवाड्यातील आदर्श महानगर बनवायचे असेल, तर भाजपलाच संधी द्या. जनतेचा वाढता प्रतिसाद पाहता भाजपचा विजय निश्चित आहे तसेच केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यामुळे जालना शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल,

माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर म्हणाले, जालना महानगरपालिकेवर भाजपचा महापौर होणार, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. भाजपने नेहमीच विकास, पारदर्शकता आणि लोकहिताला प्राधान्य दिले आहे. जालना शहराला स्वच्छ, सुंदर आणि सक्षम महानगर बनवायचे असेल, तर भाजपच्या




सर्व उमेदवारांना विजयी करणे गरजेचे आहे.

यावेळी निवडणूक प्रमुख माजी आमदार कैलास गोरंट्याल म्हणाले की, जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टी हाच एकमेव सक्षम पर्याय आहे. भाजपने नेहमीच विकासकामांना गती देत सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. महानगरपालिका निवडणुकीत जनतेने भाजपला स्पष्ट बहुमत दिल्यास शहरात पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व पायाभूत सुविधांच्या कामांना वेग मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाजपच्या नेतृत्वाखाली जालना शहर नक्कीच मराठवाड्यातील आदर्श महानगर बनेल, असे सांगत त्यांनी नागरिकांना कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, एकजुटीने भाजपच्या पाठीशी उभे रहा. प्रत्येक घराघरात भाजपचे विचार पोहोचवा. तुमचे एक एक मत जालना शहराच्या विकासासाठी आणि मजबूत नेतृत्वासाठी निर्णायक ठरणार आहे. शेवटी त्यांनी नागरिकांना कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

## निःस्वार्थ, प्रामाणिक कार्य करणाऱ्या रिंकल (सुनिता) तायड यांना विजयी करा - कल्याण आखाडे

**जालना । प्रतिनिधी -** समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने, निःस्वार्थपणे आणि प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या रिंकल (सुनिता) भगवान तायड यांना १५ जानेवारी रोजी घड्याळ या चिन्हा समोरील बटन दाबून महानगरपालिका निवडणुकीत विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सावता परिषदेचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार रिंकल उर्फ सुनीता भगवान तायड यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या रॅली प्रसंगी ते बोलत होत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण ,उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर, बदनापूरचे माजी पंचायत समिती सभापती कैलास मदन, यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रभागातील मूलभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, युवकांचे प्रश्न, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व आरोग्य या विषयांवर रिंकल तायड यांनी नेहमीच ठाम भूमिका घेत काम केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत नागरिकांमध्ये त्यांच्याबाबत विश्वास निर्माण झाला असून, त्या विश्वासाचे रूपांतर मतांच्या स्वरूपात व्हावे, असे आवाहन आखाडे यांनी केले.

निवडणूक ही केवळ उमेदवार निवडण्याची प्रक्रिया नसून, प्रभागाच्या भविष्यासाठी योग्य नेतृत्व निवडण्याची संधी आहे. रिंकल तायड यांनी आतापर्यंत केलेले कार्य, त्यांची लोकांशी असलेली थेट नाळ आणि सर्वसामान्यांसाठी झटण्याची तयारी पाहता त्या या जबाबदारीसाठी योग्य आहेत, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी व्यक्त केले.

यावेळी सतीश वाहुळे, राहुल लष्कर, विलास भावले, समाधान राठोड, वैशाली दाभाडे, कार्तिक बोराडे, पुष्पा चव्हाण ज्योती गायकवाड उषा डोंगरदिवे , सुनीता डोंगरदिवे, राधा ठोसर, संगीता ढेरे, सीमा लोंगे, प्रभा ठोकळ, यास्मिन, लीलावती डोळस यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राष्ट्रीय युवा सप्ताहाचे उत्साहात उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** शालेय शिक्षण व क्रीडा विभागअंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय ,महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना यांच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने औद्योगिक महाविद्यालय , जालना येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पाचार्य श्रीमती. बकोले होते तर प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, प्रमुख वक्ते धंनजय पटिल व डॉ. सबनीस सर होते. श्रीमती लता लोंढे, श्रीमती आरती चिल्लारे (क्रीडा अधिकारी ), राहुल गायके यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली, सर्व मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.नंतर यावेळी क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांनी आपल्या भाषणातून स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाची यथोगाथा व्यक्त केली. तसेच वक्ते धनंजय पाटिल व डॉ. सबनीस यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यानंतर श्री. नरेंद्र पवार जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षिकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## नामनिर्देशन अर्ज अवैधतेवर दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल

# जालन्यातील उमेदवारांना निवडणूक लढविण्यापूर्वीच कोर्टात जाणे कठीण

**जालना । प्रतिनिधी -** दिल्ली उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, नामनिर्देशन अर्जातील त्रुटींच्या आधारावर निवडणूक अधिकाऱ्याने घेतलेल्या निर्णयाला केवळ निवडणूक पूर्ण झाल्यानंतरच आव्हान दिले जाऊ शकते. 'संजू बाला विरुद्ध राज्य निवडणूक आयोग आणि इतर' या खटल्यात न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. या निकालामुळे, जालना महानगरपालिका निवडणुकीत ज्यांचे अर्ज किरकोळ किंवा तांत्रिक कारणास्तव अवैध ठरले आहेत, त्यांना निवडणुकीपूर्वी न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग जवळपास बंद झाला आहे.दिल्ली उच्च न्यायालयाचे तत्कालीन कार्यकारी मुख्य न्यायाधीश गीता मित्तल आणि न्यायमूर्ती अनु मल्होत्रा यांच्या खंडपीठाने निर्णय दिला की, नामनिर्देशन अर्ज फेटाळण्याच्या निर्णयाला केवळ निवडणूक याचिका दाखल करूनच आव्हान देता येते; निवडणूक प्रक्रियेच्या मधल्या टप्प्यात कोणताही कायदेशीर उपाय उपलब्ध नाही. 'संजू बाला विरुद्ध राज्य निवडणूक आयोग' या प्रकरणात, याचिकाकर्त्या संजू बाला यांचा दिल्ली महानगरपालिका निवडणुकीसाठीचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आला होता. कारण, त्यांच्या अर्जातील प्रस्तावकाचा निवासी पत्ता चुकीचा नमूद केला होता. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, प्रस्तावक हा त्या प्रभागाचा मतदार नव्हता, ज्या प्रभागातून संजू बाला निवडणूक लढवत होत्या. ही त्रुटी नामनिर्देशन अर्जात दुरुस्त करण्यासारखी होती, परंतु निवडणूक अधिकाऱ्याने अर्ज अवैध ठरवला. या निर्णयाला संजू बाला यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले.उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जोपर्यंत निवडणूक अधिकाऱ्याची कारवाई किंवा आदेश हे हेतुपुरस्सर किंवा अधिकाराचा मनमानी वापर करून घेतलेले नाहीत, तोपर्यंत निवडणूक प्रक्रियेत न्यायालय हस्तक्षेप करणार नाही. नामनिर्देशन अर्जातील दुरुस्त करण्यायोग्य अनियमितता किंवा त्रुटींसाठी निवडणूक याचिका हाच एकमेव आणि योग्य कायदेशीर मार्ग आहे. येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या जालना महानगरपालिका निवडणुकीत अनेक उमेदवारांचे अर्ज अयोग्य अर्ज किंवा प्रतिज्ञापत्र या कारणास्तव निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरवले आहेत. या पार्श्वभूमीवर, दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निकाल अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या संदर्भात बोलताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, अॅड. महेश एस. धनावत यांनी सांगितले की, दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय निवडणूक कायद्याच्या मूळ तत्त्वांना अधोरेखित करतो. भारतीय संविधानाच्या कलम २४३-झेडजी (Article 243ZG) नुसार, नगरपालिका निवडणुकांच्या प्रक्रियेत न्यायालयीन हस्तक्षेपाला मर्यादा आहेत. नामनिर्देशन अर्ज फेटाळणे, हे निवडणूक प्रक्रियेचाच एक भाग आहे. जर उमेदवाराला वाटत असेल की त्याचा अर्ज चुकीच्या पद्धतीने फेटाळला गेला आहे, तर त्याला निवडणूक पूर्ण होण्याची वाट पाहावी लागेल. त्यानंतर, तो निवडणूक याचिका दाखल करून न्यायालयात दाद मागू शकतो. ते पुढे म्हणाले, जालन्यातील ज्या उमेदवारांचे अर्ज किरकोळ किंवा तांत्रिक चुकांमुळे, जसे की प्रतिज्ञापत्रातील अपूर्ण माहिती किंवा अर्जातील किरकोळ त्रुटी, अवैध ठरले आहेत, त्यांना या निकालामुळे तात्काळ दिलासा मिळणे कठीण आहे. निवडणूक अधिकाऱ्याचा निर्णय मनमानी किंवा कायद्याचे उल्लंघन करणारा आहे, हे सिद्ध केल्याशिवाय उच्च न्यायालय सामान्यतः हस्तक्षेप करत नाही. त्यामुळे, अशा उमेदवारांना आता निवडणुकीचा निकाल लागेपर्यंत थांबावे लागेल आणि त्यानंतरच कायदेशीर लढाई लढावी लागेल. थोडक्यात, दिल्ली उच्च न्यायालयाच्या या निकालाने हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे की, निवडणूक प्रक्रिया एकदा सुरू झाल्यावर ती विनाअडथळा पार पडावी.